# अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्क मान्य करणे) अधिनियम, २००६.

## प्रकरण एक

## प्रारंभिक

**संक्षिप्त नाव व प्रारंभ.** १. (१) या अधिनियमास "अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वनहक्क मान्य करणे) अधिनियम, २००६" असे म्हणावे.

(२) तो जम्मू व काश्मीर राज्य खेरीज करून संपूर्ण भारतास लागू आहे.

(३) केंद्र सरकार, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास, तो अंमलात येईल.

**व्याख्या.** २. या अधिनियमात, संदर्भानुसार अन्य अर्थ अपेक्षित नसेल तर --

(क) "सामूहिक वन साधने" याचा अर्थ, गावच्या पारंपारिक किंवा रुढीगत सीमांतर्गत असणारी किंवा फिरस्ता आदिवासी समाजाच्या बाबतीत भूप्रदेशाचा तसेच राखीव वनांचा, संरक्षित वनांचा आणि समाजाला पारंपारिक प्रवेश असणारी अभयारण्ये व राष्ट्रीय उद्याने यासारख्या सुरक्षित क्षेत्रांचा (मोसमी) वापर असणारी रुढिगत सामायिक वन जमीन, असा आहे

(ख) "संकटग्रस्त वन्यजीवांचे वसतिस्थान" याचा अर्थ सरकारने नियुक्त केलेल्या स्थानिक तज्ञांचा अंतर्भाव असणाऱ्या आणि ज्यामध्ये आदिवासी कार्य मंत्रालयाचे प्रतिनिधी देखील अंतर्भुत असतील अशा तज्ञ समितीने विचारविनिमय केल्यावर केंद्र सरकारच्या पर्यावरण व वनीकरण मंत्रालयाने, कलम ४ ची पोटकलमे (१) व (२) च्या कार्यपध्दतीच्या स्वरुपाच्या गरजांमधून निर्धारित केलेली अशी क्षेत्रे, निश्चित व अधिसूचित केल्यानुसार वन्य प्राणी संवर्धनाच्या प्रयोजनासाठी, अबाधित ठेवलेली, राष्ट्रीय उद्याने व अभयारण्ये, असा आहे.

(ग) "वन निवासी अनुसूचित जमाती" याचा अर्थ, मुख्यत्वेकरून वनात राहणारे अनुसूचित जमातीचे सदस्य किंवा समाज, असा आहे आणि त्यामध्ये अनुसूचित जमातीचे फिरस्ता आदिवासी समाज, जे वनांवर किंवा उपजिविकेच्या खऱ्याखुऱ्या गरजांसाठी वनांवर किंवा वनजमिनींवर अवलंबून असलेला समाज यांचा समावेश होतो;

(घ) "वन भूमी" याचा अर्थ, कोणत्याही वन क्षेत्रात येणारी कोणत्याही वर्णनाची जमीन, असा आहे, आणि त्यामध्ये, वर्गीकरण न केलेली वने, सीमांकित न केलेली वने, अस्तित्वात असलेली किंवा मानीव वने, संरक्षित

उपवनसंरक्षक
गोंदिया वनविभाग, गोंदिया